



दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : ९४
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, शनिवार, दि.१६ नोव्हेंबर २०२४


## श्रीमंत दगडूशेठ गणपतीला ५२१ पदार्थांचा महानैवेद्य !



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१५, पुणे :** मिठाई, फराळाच्या तिखट-गोड पदार्थांपासून विविध प्रकारच्या फळांची करण्यात आलेली आकर्षक आरास आणि विविध रसास्वादाच्या तब्बल ५२१ प्रकारच्या पदार्थांचा नैवेद्य बाप्पाला अर्पण करण्यात आला. त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त दगडूशेठ गणपती मंदिरात अन्नकोट आणि कळसापासून गाभाऱ्यापर्यंत सुमारे १ लाख २५ हजार दिव्यांनी संपूर्ण मंदिर सजविण्यात आले. पुणेकरांनी हे दृश्य डोळ्यांमध्ये साठविण्यासोबतच मोबाईल कॅमेऱ्यामध्ये कैद करण्यासाठी मोठी गर्दी केली.

श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळाच्यावतीने त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त दगडूशेठ गणपती मंदिरामध्ये दीपोत्सव आणि अन्नकोट आयोजित करण्यात आला होता. यावेळी ट्रस्टचे विश्वस्त, कार्यकर्ते उपस्थित होते. मंदिराच्या कळसासह संपूर्ण गाभाऱ्यात लावलेल्या पणत्यांनी मंदिराचा परिसर उजळून निघाला होता. याशिवाय तोरण आणि फुले, रांगोळ्यांनी मंदिराचा परिसर आकर्षक पद्धतीने सजविण्यात आला.

यावेळी सुनील रासने म्हणाले की, त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त आयोजित अन्नकोटाकरीता पदार्थ देण्याचे आवाहन ट्रस्टतर्फे भाविकांना करण्यात आले होते. त्यानुसार तब्बल ५२१ हून अधिक प्रकारचे पदार्थ भाविकांकडून मंदिरात गोळा झाले. ते सर्व पदार्थ अन्नकोटाम ध्ये मांडण्यात आले. या सर्व पदार्थांचा प्रसाद मंदिरातील भक्तांना देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## माजी आ.सुरेश लाड यांना राजकारणातून संपवण्याचे काम सुधाकर घारे यांनी केले - राजेश लाड



**अक्षराज : मानसी कांबळे**

**दि.१५, कर्जत :** कर्जत-खालापूर विधानसभा मतदार संघात राष्ट्रवादी काँग्रेसचे तीन वेळा आमदार राहिलेले सुरेश लाड यांना राजकारणातून संपविण्याचे आणि त्यांचे मानसिक खच्चीकरण करण्याचे काम रायगडची अदृश्य शक्ती अर्थात खा. सुनील तटकरे आणि सुधाकर घारे यांनी केले असल्याचा गंभीर आरोप भाजपचे नेते राजेश लाड यांनी केला आहे. राजेश लाड हे माजी आ. सुरेश लाड यांचे भाऊ असून ते सद्या भाजपात काम करीत आहेत, ते आयोजित महायुतीच्या पत्रकार परिषदेत बोलत होते.

कर्जत खालापूर विधानसभा मतदार संघात दिवसेंदिवस राजकीय वातावरण तापत असून आज महायुतीने पत्रकार परिषद घेत सुधाकर घारे यांनी केलेल्या अनेक आरोपांना जशास तसे उत्तर दिले. अपक्ष उमेदवार असलेले सुधाकर घारे यांचा राजकीय जन्म हा २०१४ साली झाला असून माजी आ. सुरेश लाड यांच्यामुळे ते आज राजकारणात दिसत आहेत. त्यांना सुरेश लाड यांनी जिल्हा परिषदेला निवडून आणून जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष केले. ते उपाध्यक्ष झाल्यानंतर त्यांना आमदारकीची स्वप्ने पडू लागल्याने त्यांनी सुरेश लाड यांना डावलून राष्ट्रवादीच्या काही बगलबच्चे यांना सोबत घेऊन खा. सुनील तटकरे यांच्या माध्यमातून सुरेश लाड यांना जाणूनबुजून डावलून त्यांना राजकारणातून संपविण्याचे काम केले. त्यांचे म ानसिकदृष्ट्या खच्चीकरण केले. सुधाकर घारे हे नेतृत्व विश्वासघातकी असल्याचा आरोप राजेश लाड यांनी केला आहे.

लाड पुढे म्हणाले की, माजी आम दार सुरेश लाड हे भाजपात असून त्यांच्या आदेशानुसार महायुतीचे उमेदवार महेंद्र थोरवे यांच्या विजयासाठी आम्ही सर्वजण ताकतीने कामाला लागलो आहे. यावेळी भाजप नेते सुनील गोगटे, संतोष भोईर आदींनी महायुतीची भुमिका मांडली.

या पत्रकार परिषदेला शिवसेना शिंदे गट रायगड जिल्हाप्रमुख संतोष भोईर, सुनील गोटीराम पाटील, भाई गायकर, भाजपचे सुनील गोगटे, राजेश लाड, वसंत भोईर, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया कोकण कार्याध्यक्ष राहुल डाळिंबकर, रायगड जिल्हाध्यक्ष नरेंद्र गायकवाड, शिवसेनेचे भाई शिंदे, अॅड. संकेत भासे, संभाजी जगताप आदी उपस्थित होते.

## ठाणे जिल्ह्यातील सर्व आस्थापनांनी कामगार, कर्मचाऱ्यांनामतदानासाठी सवलत देऊन कर्तव्य बजावावे



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१५ ठाणे :** विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी येत्या २० नोव्हेंबर रोजी होणाऱ्या मतदानादिवशी ठाणे जिल्ह्यातील सर्व संघटित, असंघटित क्षेत्रातील कामगार, कर्मचारी यांना मतदानासाठी दोन तासाची सवलत अथवा पूर्ण दिवसाची भरपगारी सुट्टी देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या निर्देशाचे सर्व आस्थापनांनी काटेकोर पालन करावे तसेच मतदानाचे कर्तव्य बजावण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अशोक शिनगारे यांनी आज येथे केले.

जिल्ह्यातील मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी जिल्ह्यातील विविध आस्थापना, दुकाने, संघटनांची बैठक आज जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अशोक शिनगारे यांनी घेतली. यावेळी ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी वैशाली माने, कामगार उपायुक्त प्रदीप पवार यांच्यासह जिल्ह्यातील विविध उद्योग संघटना, आस्थापनांचे प्रमुख उपस्थित होते. जिल्हाधिकारी महोदयांनी केलेल्या आवाहनास उपस्थित सर्व आस्थापना, संस्था, उद्योग प्रमुखांनी स्वागत करून या उपक्रमात सक्रिय योगदान देण्याचे आश्वासन यावेळी दिले.

मतदान करणे हे आपले कर्तव्य आहे. या कर्तव्यापासून एकही मतदार वंचित राहता कामा नये, यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे आवश्यक आहे. ठाणे जिल्हा हा विविध क्षेत्रात अग्रेसर आहे. मात्र, गेल्या निवडणुकीत जिल्ह्यातील मतदानाची टक्केवारी कमी झालेली दिसून आली आहे, हे आपल्या ठाणे जिल्ह्यासाठी भूषणावह नाही. त्यामुळे यंदाच्या विधानसभा निवडणुकीत ठाणे जिल्ह्यात किमान ७५ टक्के मतदान व्हावे, यासाठी जिल्हा यंत्रणा विविध माध्यमातून उपक्रमाद्वारे जनजागृती करत आहे. जिल्ह्यात उद्योग, व्यवसायात तसेच संघटित व असंघटित क्षेत्रात मोठ्या प्रमाणात कामगार वर्ग काम करत आहे. या कामगारांना मतदान करण्यासाठी पूर्ण दिवसाची भर पगारी सुट्टी द्यावी. तसेच जवळच्या ठिकाणी राहणाऱ्या कामगारांना मतदानासाठी जेवढा वेळ लागेल, तेवढ्या वेळेची सवलत द्यावी. तसेच त्या कामगारांनी/कर्मचाऱ्यांनी मतदान केले आहे की नाही याची खातरजमा संबंधित आस्थापनांनी करावी, अशा सूचनाही श्री. शिनगारे यांनी दिल्या.

मतदानासाठी कामगार, कर्मचाऱ्यांना मतदानासाठी वंचित ठेवून कामावर बोलविणाऱ्या आस्थापना, दुकाने, उद्योगसंस्था यांच्यावर योग्य ती कारवाई केली जाईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. घुगे म्हणाले की, ठाणे जिल्ह्यातील मतदानाची टक्केवारी वाढवी, कोणताही पात्र मतदार मतदानापासून वंचित राहू नये, यासाठी जिल्हा यंत्रणा काम करीत आहे. मतदानाची प्रक्रिया सुखद व्हावी, यासाठी प्रशासनाने सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्या आहे. नागरिकांना आपल्या मतदान केंद्राची माहिती व्हावी, यासाठी व्होटर हेल्पलाईन अॅपची सुविधा देण्यात आली आहे. तसेच जिल्हा निवडणूक प्रशासनाच्या वतीने मतदान केंद्राचा क्यूआर कोड तयार करण्यात आला आहे. या दोन्हींची माहिती आपल्या कामगार, कर्मचाऱ्यांपर्यंत पोहचवून मतदानासाठी त्यांना प्रवृत्त करावे.

## कोळसेवाडी पोलिसांची चमकदार कामगिरी चेन स्नॅचरला २ तासांत पकडले...



**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.१५, कल्याण (ठाणे) :** कोळसेवाडी पोलिसांनी अतिशय जलद कारवाई करत एका फळविक्रेते महिलेचे तीन तोळ्याचे गंठण चोरणाऱ्या चेन स्नॅचरला फक्त दोन तासांत अटक केली आहे. ही घटना रात्री १ वाजता घडली होती, आणि चोरी झाल्यानंतर अवघ्या काही वेळातच पोलिसांनी गुन्हेगाराला पकडून चोरी केलेला माल हस्तगत केला आहे शहरातील एका फळविक्री करणाऱ्या महिलेच्या गळ्यातील तीन तोळ्याचे सोन्याचे गंठण एका चोरा कडून हिसका मारून पळवले. या घटनेनंतर महिलेकडून तात्काळ कोळसेवाडी पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवण्यात आली. कोळसेवाडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक कदम , एपीआय भालेराव यांच्या टीम ने वेगाने तपास सुरू करून आरोपीला पकडण्यासाठी परिसरातील सीसीटीव्ही आधारे आरोपीच्या हालचालींचा मागोवा घेण्यात आला.अटक करण्यात आलेल्या आरोपीकडून चोरी केलेले तीन तोळे सोन्याचे गंठण जप्त करण्यात आले.

पोलीस परिमंडळ ३ चे उपायुक्त अतुल झेंडे यांनी कोळसेवाडी पोलिसांच्या या जलद आणि यशस्वी कारवाईचे कौतुक केले आहे. त्यांनी पोलिसांच्या तात्काळ प्रतिसादामुळे नागरिकांचा पोलिसांवरील विश्वास अधिक दृढ होत असल्याचे सांगितले अटक करण्यात आलेल्या आरोपीवर संबंधित कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे.आरोपी हा रेकॉर्ड वरचा गुन्हेगार असून त्याच्या नावावर ३ गुन्हे असल्याचे तपासात दिसून आले आहेत. कोळसेवाडी पोलिसांच्या या यशस्वी कारवाईमुळे स्थानिक नागरिकांनी पोलिसांचे कौतुक केले असून, त्यांच्या तत्परतेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## वाई, खंडाळा, महाबळेश्वरची तरुण पिढी लाभनायक यांनी केली बरबाद



**अक्षराज : धर्मेंद्र वर्पे**

**दि.१५, वाई (सातारा) :** वाई खंडाळा विधानसभा मतदारसंघातील तरुण पिढी गुंडगिरी व व्यसनाधीनतेच्या मार्गाला लागली असून हजारो कुटुंब यामुळे उध्वस्त झाली आहेत. मतदारसंघातील युवकांच्या हाताला काम नाही. मात्र, लाभनायक आम दारांनी गावोगावी युवकांची ससेहोलपट चालवली आहे. या झुंडशाहीला जाब कोण विचारणार? सर्वच सत्ता त्यांच्या घरात असल्याने जनतेने न्याय मागायचा कुणाकडे? मात्र, आता तरुण पिढीने न भीता समोर येऊन विद्यमान आमदारांना जाब विचारण्याची गरज आहे. असे स्पष्ट मत वाई खंडाळा महाबळेश्वर विधानसभा मतदार संघाचे अपक्ष उमेदवार पुरुषोत्तम जाधव यांनी मांढरदेव ता.वाई येथील तरुणांच्या गाठी भेटी दरम्यान व्यक्त केले.

यावेळी बोलताना पुरुषोत्तम जाधव म्हणाले, ज्या भुईंज गावची ओळख खासदारांचे गाव सुसंस्कृत विचारांचे गाव भृगुऋषिंच्या पदस्पर्शाने पावन झालेले भुईंज गाव अशी ओळख होती. त्या भुईंज गावातील १७ युवकांवर एकाच वेळी मोक्का लागतो. ह्याला विकास म्हणायचा का?अशा लाभनायकाला हटवा आणि किटली चिन्हांचे बटन दाबून सुसंस्कृत विचारांच्या उमेदवाराला विधानसभेत पाठवा. तसेच गावोगाव दोन गट पाडायचे त्यात एखादा विकास कामांचा शेंगदाणा टाकायचा आणि दोन गटात झुंज लावून द्यायची ही प्रवृत्ती वेळीच रोखली नाही तर पुढची पिढी आपणास माफ करणार नाही.

### ठेकेदारांची गावोगावी झुंडशाही !

वाई खंडाळा महाबळेश्वर मतदारसंघात विद्यमान आमदारांनी आपले बगल बच्चे कॉन्ट्रॅक्टर सांभाळून त्यांच्यामार्फत गावोगावी झुंडशाही सुरू केली आहे. प्रत्येक गावात गुंडगिरी च्या माध्यमातून दडपशाही आणली जात आहे मात्र सामान्य जनता आता माझ्या पाठीशी ठामपणे उभी राहिली आहे असे मत पुरुषोत्तम जाधव यांनी व्यक्त केले.

## पुणे शहरात वेगवेगळ्या अपघातात तिघांचा मृत्यू

**दि.१५, पुणे :** शहरात वेगवेगळ्या अपघातात तिघांचा मृत्यु झाल्याची घटना घडली. पुणे-सोलापूर रस्त्यावर मगरपट्टा परिसरात भरधाव वाहनाच्या धडकेत पादचारी ज्येष्ठ नागरिकाचा मृत्यू झाला, तसेच बिबवेवाडीतील स्वामी विवेकानंद पुतळा परिसरात रिक्षाच्या धडकेत ज्येष्ठ नागरिकाचा मृत्यू झाल्याची घटना घडली. याच परिसरात दुचाकी घसरुन सहप्रवासी तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना नुकतीच घडली.

पुणे-सोलापूर रस्त्यावर मगरपट्टा सिटी परिसरात भरधाव वाहनाच्या धडकेत पादचारी ज्येष्ठ नागरिकाचा मृत्यू झाल्याची घटना मंगळवारी (१३ नोव्हेंबर) सायंकाळी पावणेसहाच्या सुमारास घडली. सतीश वामनराव जगताप (वय ६१) असे मृत्युमुखी पडलेल्या पादचाऱ्याचे नाव आहे. याप्रकरणी वाहनचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस उपनिरीक्षक केतकी चव्हाण तपास करत आहेत. बिबवेवाडीतील स्वामी विवेकानंद पुतळ्याजवळ रिक्षाच्या धडकेत पादचारी ज्येष्ठ नागरिकाचा मृत्यू झाल्याची घटना नुकतीच घडली. रविंद्रकुमार सिन्हा (वय ६३, रा. बिबवेवाडी) असे मृत्युमुखी पडलेल्या पादचाऱ्याचे नाव आहे.

## संपादकीय



### आचार्य विनोबा भावे

थोर गांधीवादी नेते भूदान चळवळीचे प्रवर्तक आचार्य विनोबा भावे यांची १५ नोव्हेंबर रोजी ४२ वी पुण्यतिथी होती. कोकणातील रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यातील गोगादे या छोट्या गावात ११ सप्टेंबर १८९५ रोजी त्यांचा जन्म झाला. त्यांचे मूळ नाव विनायक नरहर भावे असे होते. आचार्य ही त्यांना मिळालेली पदवी आहे. त्यांचे मूळ गाव सातारा जिल्ह्यातील वाई हे आहे. त्यांच्या अनेक पिढ्यांचे वास्तव्य वाई येथे होते. तिथे त्यांचे आजोबा आणि आईने त्यांच्यावर धर्मपरायणतेचे संस्कार केले. वाई मुक्कामी विनोबा भावे यांनी स्वामी केवलानंद सरस्वतीच्या चरणांशी उपनिषदे, ब्रह्मसुत्रे, शंकरभाष्ये व पतांजलीचे शिक्षण घेतले. पुढे नोकरीनिमित्त त्यांचे वडील बडोदा येथे गेले. तिथेच त्यांचे माध्यमिक व उच्च शिक्षण झाले. तिथे त्यांनी संस्कृत, फ्रेंच भाषेचा आणि इतर अनेक ग्रंथांचा अभ्यास केला. १९१६ साली महाविद्यालयीन इंटरची परीक्षा देण्यासाठी ते मुंबईला निघाले. पण वाटेतच सुरतेस उतरुन आई वडिलांना न कळवता ते वाराणसी येथे निघाले. त्यांना दोन गोष्टींचे आकर्षण होते हिमालय आणि बंगालचे सशस्त्र क्रांतिकारक. वाराणसी येथे हिंदू विश्वविद्यालयात त्यांनी महात्मा गांधींचे भाषण ऐकले आणि त्या भाषणाचा त्यांच्यावर खोल परिणाम झाला. हिमालयातील अध्यात्म आणि बंगालमधील क्रांती या दोन्हींच्या प्रेरणा त्यांना महात्मा गांधींच्या उक्तीत आणि व्यक्तिमत्वात आढळल्या. ७ जून १९१६ रोजी कोरचब आश्रमात त्यांनी गांधीजींची भेट घेतली. या भेटीतच त्यांनी ब्रह्मचार्यांची शपथ घेतली आणि जीवनसाधनेस सुरवात केली. तिथे ते सूतकताई शिकले. १९२१ रोजी जमनालाल बजाज यांनी साबरमती आश्रमाची शाखा वर्ध्यास काढली तिचे संचालक म्हणून ८ एप्रिल १९२१ रोजी त्यांनी जबाबदारी स्वीकारली. भगवत गीतेचे सार त्यांनी अत्यंत सोप्या आणि रसाळ शैलीत गीताई आणि मधुकर या ग्रंथातुन मांडले. त्यांचे सर्वात मोठे कार्य म्हणजे भूदान चळवळ. मोठ्या जमीनदारांकडून जमीन घेऊन त्यांनी त्या भूमिहीनांना दिल्या. भूदान आंदोलनासाठी त्यांनी देशभर यात्रा काढली. गरिबांच्या कल्याणासाठी त्यांनी सर्वोदय योजना सुरू केली. १९३०-३२ च्या कायदेभंग चळवळीत कारावास भोगलेले विनोबा भावे महात्माजींच्या १९४० च्या वैयक्तिक सत्याग्रहाचे गांधींनी निवडलेले पहिले सत्याग्रही होते. १९५१ ते १९५३ हा भूदान यात्रेचा कालावधी वगळता सारे आयुष्य त्यांनी वर्ध्याच्या पवनार आश्रमात काढले. भारत सरकारने त्यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान केला. समाजाला मानव धर्माचे शिक्षण देणाऱ्या या सत्पुरुषाचे १५ नोव्हेंबर १९८२ रोजी निधन झाले.

**आचार्य विनोबा भावे यांना पुण्यतिथीनिमित्त विनम्र अभिवादन!**

### वेसवी/नांदगाव अंगणवाडीत बालदिन साजरा

**अक्षराज : उमेश तबिब**


**दि.१५, दापोली (रत्नागिरी) :** बाल विकास सेवा योजना अंतर्गत अंगणवाडी केंद्र वेसवी नांदगाव या ठिकाणी बालदिन साजरा करण्यात आला. सर्वप्रथम माजी पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या प्रतिमेस वेसवी गावचे सरपंच सौ प्रविणा खाडे यांनी पुष्पहार घालून व वंदन करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. १४ नोव्हेंबर हा बाल दिन सर्वत्र साजरा केला जातो. उपस्थित लाभार्थ्यांना तसेच मान्यवरांना बाल दिना विषयी अंगणवाडी सेविका शलाका पवार यांनी माहिती दिली.

त्यावेळी वेसवी गावचे सरपंच प्रवीणताई खाडे पालक सुवर्णा खाडे, सुलोचना खाडे व इतर गावातील ग्रामस्थ व महिला वर्ग व पालक वर्ग उपस्थित होते सर्व उपस्थित मान्यवरांचे आभार मानून कार्यक्रमाचे सांगता करण्यात आली.

# जननायक धरती आबा : भ. बिरसा मुंडा !

सन १८५७च्या क्रांतीनंतर इंग्रजांनी छोटा नागपूर प्रदेशातील मुंडा जमातींच्या शेतजमिनी हिरावून घेतल्या होत्या. त्या परत मिळविण्यासाठी मुंडांचे प्रमुख ज्यांना सरदार म्हटले जात, त्यांनी इंग्रजांविरुद्ध संघर्ष सुरू केला. तो संघर्ष सरदारी लढाई म्हणून प्रसिद्ध झाला. या आंदोलनात्मक लढाईचा भगवान बिरसांच्या मनावर मोठा प्रभाव पडला होता. त्यांनी इंग्रजांच्या गुलामीत असलेल्या आदिवासी समाजाला मुक्त करण्यासाठी क्रांतिकारक चळवळीला सुरुवात केली. त्यामुळे अनेक मुंडा जमातींनी त्यांच्यासोबत सरदार आंदोलनात सहभाग घेतला. त्यांनी चालविलेले व्यापक आंदोलन दडपण्यासाठी इंग्रजांनी दोन नियम-अटी लागू केले होते- १) इंग्रजांनी अनेक ठेकेदारांना दारूचे अड्डे चालविण्यासाठी परवाने दिले. अशिक्षित मुंडा आदिवासी नेहमी दारूच्या नशेत राहून ते आंदोलनापासून अलिप्त राहतील, असा त्यांचा हेतू होता. भगवान बिरसांनी या नियमांना विरोध करत इंग्रजांविरुद्ध आवाज उठविला. आदिवासी बांधवांना शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. २) गावागावांत जेवढ्या आदिवासींच्या जमिनी आहेत, त्यांवर सरकारी वनाधिकाऱ्यांचा अधिकार आहे. या नियमामुळे मुंडा लोकांचा जगण्याचा अधिकार हिरावला जाऊन समाजाचे नुकसान होणार होते.

क्रांतिवीर भगवान बिरसा मुंडा हे आदिवासी समाजक्रांतीचे जनक व एक स्वातंत्र्यसेनानी होते. त्यांचा जन्म दि.१५ नोव्हेंबर १८७५ रोजी झारखंडमधील उलिहातू या छोट्याशा खेड्यात झाला. त्यांचे वडील सुगना व आई करमी हे होत. जन्म गुरुवारी म्हणजे बिस्युतवार किंवा बृहस्पतिवार या दिवशी झाला, म्हणून त्यांचे नाव बिरसा ठेवण्यात आले. त्यांच्या कुटुंबाची परिस्थिती हलाखीची होती. त्यामुळे त्यांच्या जन्मानंतर सर्व कुटुंब उदरनिर्वाहासाठी त्यांची आत्या दासकीर हिच्या आयुभातू या गावी गेले. बासरी व टुईला वाजविणे, नृत्य, नकला, चित्र रेखाटणे, आखाड्यात जाणे इत्यादी छंदही त्यांच्या अंगी होते. मुंडांना शिक्षणाची खुप आवड होती. सुरुवातीला ते आयुभातूजवळ सलगा गावच्या आश्रमात जात. ते आश्रम जयपाल नाग हा आदिवासी व्यक्ती चालवित होता. पुढे सन १८८६ मध्ये बिरसांचे मोठे भाऊ कानु यांनी त्यांना जर्मन ईसाई मिशन स्कूलमध्ये दाखल केले. तत्पूर्वी शाळेच्या अटीनुसार त्यांना ख्रिश्चन धर्म स्वीकारावा लागला. शाळेमध्ये जर्मन लुथेरियन मिशनचे अध्यक्ष फादर नोट्रोट यांनी भाषणात मुंडा आदिवासींबद्दल ठग, चोर, बेइमान इत्यादी शब्दांचा वापर केला. तेव्हा त्यांनी फादर नोट्रोट यांना खडसावून प्रत्युत्तर दिले. त्यामुळे सन १८९० या चौथ्याच वर्षी बिरसांना शाळेतून काढण्यात आले. पुढे त्यांनी शिक्षणासाठी अंगीकारलेल्या ख्रिश्चन धर्माचा त्याग केला. उदरनिर्वाहासाठी ते चार वर्षे बांदगाव येथे वास्तव्यास होते. त्यांचा विवाह हिरीबाई नामक मुलीशी झाला; परंतु अल्प काळातच तिचे निधन झाले. त्यांनी आनंद पांडे या वैष्णव पंथीयांकडून धार्मिक शिक्षण घेतले. हे शिक्षण घेत असताना मुंडा जमातीच्या परंपरागत जीवनपद्धतीमध्ये, धर्मामध्ये परिवर्तन व सुधारणा करण्याची आवश्यकता असल्याचे त्यांच्या लक्षात आले. हिंदू, ख्रिश्चन व मुंडा आदिवासी या धर्मातील चांगली तत्त्वे एकत्रित करून नव्या बिरसाईट धर्माची स्थापना केली. यासाठी त्यांनी लोकसंघटन करून मुंडा जमातीत एकता निर्माण केली. ईसाई धर्म हा विदेशी असल्यामुळे तो आपल्या पूर्वजांच्या परंपरेला कलंकित करणारा आहे, अशी लोकजागृती ते करू लागले. त्यामुळे ते भगवान बिरसा म्हणून ओळखले जाऊ लागले.



सन १८९४मध्ये आदिवासी भागात मोठ्या प्रमाणात दुष्काळ पडला होता. इंग्रजांकडून कोणतीही मदत मिळत नव्हती. उलट, इंग्रजांनी आदिवासींकडून जमीन महसूल ठरावीक तारखेलाच रोख स्वरूपात भरण्याची सक्ती केली. त्यामुळे अनेकांना आपल्या जमिनी सावकार आणि जमीनदार यांच्याकडे गहाण ठेवाव्या लागल्या. भरमसाठ व्याजदरांमुळे तारण ठेवलेल्या जमिनी सोडवून घेणे, त्यांना अशक्य बनले. जमीनमालकी असणारे लोक भूमिहीन व वेठबिगार बनले. त्यामुळे बिरसांनी इंग्रजांविरुद्ध आदिवासी तरुण बांधवांचे संघटन केले. समाजबांधवांनी एकत्र येऊन धोकेबाज इंग्रजांना यमसदनी पाठवावे. त्यामुळे आपले राज्य येईल, असे ते सांगत. त्यांच्या शब्दांमुळे अनेक मुंडांनी ठेकेदार व इंग्रजांच्या कामास जाणे बंद केले. इंग्रजांपेक्षा आपण बलाढ्य कसे आहोत? हे सांगून ते समाजामध्ये नवचेतना निर्माण करीत. त्यांनी स्वराज्याची घोषणा करून इंग्रज शासनापुढे सशक्त आव्हान निर्माण केले. त्यामुळे इंग्रज शासनाने त्यांना बंदी करण्याचे ठरविले. ब्रिटिशांनी दि.२६ ऑगस्ट १८९५ रोजी भ.बिरसा व त्यांच्या सहकाऱ्यांना पकडले. त्या सर्वांच्या अटकेमुळे पुन्हा मुंडा समाजात इंग्रजांविरुद्ध असंतोष निर्माण झाला. अखेर दि.३० नोव्हेंबर १८९७ रोजी बिरसांची सुटका झाली. तुरूंगातून सुटल्यानंतर भगवान बिरसांनी सेवादलाची स्थापना केली. गावोगावी गुप्त बैठका घेऊन मुंडाराज्य स्थापन करण्याच्या शपथा घेण्यात आल्या. त्यामध्ये सुमारे पाच हजार आदिवासी समाजबांधव सामील झाले होते. त्यांनी कायद्याची लढाई सोडून दि.२५ डिसेंबर १८९९पासून इंग्रज अधिकारी, इंग्रजधार्जिणे ठेकेदार, जमीनदार, सावकार व ख्रिश्चन धर्मप्रसारक यांच्या विरोधात आक्रमक पवित्रा घेत प्राणघातक हल्ले करण्यास सुरुवात केली. सिंगभूम, चक्रधरपूर, रांची, खुंटी, कोरा, तामाड आदी प्रदेशांतील पोलीस चौक्या जाळण्यात आल्या. या मुक्ती आंदोलनाला मुंडारी भाषेत उलगुलान असे म्हणतात. या आंदोलनात आदिवासींनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला होता. पोलिसांच्या गोळीबारात व मुंडांच्या तिरकामठ्यांद्वारे हजारो पोलीस व त्यांचे सहकारी मारले गेले. अखेर भ.बिरसांना शह देण्यासाठी इंग्रजांनी कूटनीतीचा वापर केला. त्यांना जो कोणी पकडून देईल त्याला इंग्रजांकडून पाचशे रुपयांचे बक्षीस ठेवण्यात आले होते. पैशाच्या लालसेपोटी मनमारू व जवाईकेला या गावातील काही युवकांनी भ.बिरसा जंगलात असल्याची बातमी इंग्रजांना दिली. त्यामुळे ते दि.३ फेब्रुवारी १९०० रोजी बिरसांना पकडू शकले. रांची येथे कैदेत असताना इंग्रजांनी त्यांचा अतोनात छळ केला. तेथेच त्यांचे दि.९ जून १९०० रोजी निधन झाले.

**!! जयंती निमित्त त्यांना व त्यांच्या समाजक्रांतीला मानाचा मुजरा !!**
**श्री.एन. के.कुमार जी.**
**मु. पिसेवडधा, जि. गडचिरोली.**
**फक्त व्हॉट्सअॅप- ९४२३७१४८८३.**

### जॉय वर्धापन दिना निमित्त होणार पुरस्कार वितरण

**दि.१५, मुंबई :** जॉय ऑफ गीविंग सामाजिक संस्थेचा वर्धापन दिन येत्या फेब्रुवारी महिन्यात साजरा होणार असून या निमित्ताने समाजातील विविध घटकांसाठी काम करणाऱ्या मान्यवरांना आदर्श शिक्षक शिक्षिका, आदर्श सामाजिक कार्यकर्ता, आदर्श पत्रकार, आदर्श वृत्तपत्र लेखक, आदर्श संपादक, जीवन गौरव पुरस्कार, आदर्श शाळा, आदर्श सामाजिक संस्था असे पुरस्कार देण्यात येणार असून इच्छुकानी आपले प्रस्ताव दिनांक १५ जानेवारी २०२५ पर्यंत अध्यक्ष गणेश हिरवे जॉय सामाजिक संस्था, २/१२ पार्वती निवास रामनगर बांद्रेकरवाडी जोगेश्वरी पूर्व मुंबई ४०००६० येथे पाठवणे आवश्यक आहे.

### तपासा बॅगा..

चला रे तपासा बॅगा
आला वरून आदेश
मोठ मोठ्या नेत्यांचा
केला म्हणे समावेश

कसून करे तपासणी
कसाआगळा आवेश
काहीतरी मिळे काय
दावेअसाअभिनिवेश

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

सापडत नाही काही
लपवून ठेवती अपेश
माहीत असते आधी
घालणारं नसे विशेष

पूर्व नियोजित नसावे
उचीत पोचवा संदेश
गैरकृत्ये नको घडाया
मनाला बोचती क्लेश

आयोगा काम कठीण
नको संताप लोभ द्वेष
समानन्याय सकलास
सामान्य असे वा नरेश

यंत्रणा सक्षम बनावी
जाणून घ्यायचा उद्देश
प्रत्यक्षातआण निवेश
कडककारवाई निर्देश

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

# नि:स्वार्थ पक्षपात न करता बातमी हिच खरी पत्रकारिता !

आज 'राष्ट्रीय पत्रकार दिन' संपूर्ण भारतात लोकशाहीचा विश्वास प्रस्थापित करून बनलेला चौथा स्तंभ म्हणजे पत्रकारिता. समाजात होणाऱ्या अन्याया विरुद्ध न्याय मिळवून देण्याचं कार्य पत्रकारिता करते. समाजच काय तर देशातील प्रत्येक घटनेच्या मागे या चौथ्या स्तंभाचा महत्वाचा भाग आहे. भारतातील पत्रकारिता कानाकोपऱ्यात पसरावी, त्याची वाढ व्हावी व गुणवत्तात्मक विकास व्हावा, यासाठी केंद्र सरकारने ४ जुलै १९६६ रोजी 'प्रेस काउंसिल ऑफ इंडिया'ची स्थापना केली. सर्व कायदेशीर व प्रशासकीय बाबी पूर्ण झाल्यावर १६ नोव्हेंबर १९६६ रोजी काऊंसिलचं काम विधिवत सुरू झालं. भारतातील स्वतंत्र आणि जबाबदार पत्रकारितेचे प्रतीक म्हणून दरवर्षी १६ नोव्हेंबर रोजी राष्ट्रीय पत्रकार दिन साजरा केला जातो. याच दिवशी प्रेस काऊन्सिल ऑफ इंडियाने काम करण्यास सुरुवात केली. म्हणून १६ नोव्हेंबर हा दिवस देशातील जबाबदार आणि मुक्त पत्रकारिता दर्शवतो.

स्वतंत्र्यापूर्वी पासून पत्रकारितेनं देशात स्वतंत्र्याचा एक लढा पुकारला होता. वेळेनुसार पत्रकारितेमधे बदल होत गेला आणि आजच्या काळात भारतातील पत्रकारिता एका वेगळ्या शिगेला गेली आहे. पण या सर्वात पत्रकारितेवर अनेक वेळा आरोप देखील करण्यात आले. ज्यामध्ये आधुनिक काळातील पत्रकारिता सर्वगुण संपन्न जरी झाली खरी. पण त्यामध्ये पोकळी देखील मोठ्या प्रमाणात सर्वसामान्य जनतेला दिसून आली. तरी देखील पत्रकारिता मात्र अजूनही थांबली नाही काही अपवाद वगळता आजही त्याच ताकदीने पत्रकारिता राष्ट्रीय स्तरावर होतांना दिसत आहे. ज्या मध्ये देशातील प्रत्येक घटकांचा अभ्यास करत आजची पत्रकारिता एक महत्वाचा पाया रोवतांना दिसत आहे.

भारतातील स्वतंत्र आणि जबाबदार प्रेसचे प्रतीक आहे. हाच तो दिवस होता ज्या दिवशी प्रेस कौन्सिल ऑफ इंडियाने नैतिक 'वॉचडॉग' म्हणून काम करायला सुरुवात केली होती की या सशक्त माध्यमाकडून प्रेसने केवळ



**- प्रविण बागडे नागपूर**
**भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९**

उच्च दर्जाचीच अपेक्षा ठेवली नाही तर ती कोणत्याही बाह्य घटकांच्या प्रभावाने किंवा धमक्यांमुळे अडकली नाही. जरी जगभरात अनेक प्रेस किंवा मीडिया कौन्सिल आहेत, तरीही प्रेस कौन्सिल ऑफ इंडिया ही एक अद्वितीय संस्था आहे. कारण स्वातंत्र्याचे रक्षण करण्याच्या कर्तव्यात राज्याच्या साधनांवरही अधिकार वापरणारी ही एकमेव संस्था आहे. प्रेस कौन्सिलच्या स्थापनेची शिफारस करून पहिल्या प्रेस कमिशनने असा निष्कर्ष काढला होता की पत्रकारितेत व्यावसायिक नैतिकता टिकवून ठेवण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे कायदेशीर अधिकार असलेली संस्था अस्तित्वात आणणे, मुख्यतः उद्योगाशी संबंधित लोक ज्यांचे कर्तव्य मध्यस्थी करणे असेल. यासाठी प्रेस कौन्सिल ऑफ इंडियाची स्थापना करण्यात आली आणि स्थापनेपासून विकसित झालेल्या संस्थेने हे उद्दिष्ट नाकारले नाही. काऊन्सिल ऑफ इंडिया विश्वासार्हता राखण्यासाठी सर्व पत्रकारितेच्या क्रियाकलापांवर लक्ष ठेवते. देशातील सुदृढ लोकशाही राखण्यासाठी प्रेस काऊन्सिल ऑफ इंडियाची महत्त्वाची भूमिका आहे. हे भारतातील प्रेसवर कोणत्याही बाह्य बाबींचा प्रभाव पडणार नाही याचीही खात्री करते.

प्रेस काऊन्सिल ऑफ इंडिया ही एक वैधानिक संस्था आहे, ज्याला प्रिंट मीडियाच्या ऑपरेशनवर देखरेख ठेवण्याचा अधिकार आहे. प्रेस काऊन्सिल अॅक्ट १९७८ द्वारे जनादेशाद्वारे हे अधिकार मिळाले आहेत. याअंतर्गत एक स्पीकर आणि इतर २८ सदस्य असतात, ज्यापैकी २० प्रेसचे प्रतिनिधीत्व करतात. पाच संसदेच्या दोन सभागृहांद्वारे नामनिर्देशित केले जातात आणि तीनजण संसदेत प्रतिनिधित्व करतात. सांस्कृतिक, साहित्यिक आणि कायदा विषयातून हे निवडले जातात. ही एक वैधानिक, अर्ध-न्यायिक संस्था आहे, जी देखरेखीच्या रुपात काम करते. यामाध्यमातून नैतिकतेचे उल्लंघन आणि पत्रकारिता स्वातंत्र्य उल्लंघनाच्या तक्रारींचे निराकरण केले जाते. सर्वप्रथम हिकीचे 'बेंगॉल गॅझेट' हे साप्ताहिक इंग्रजी वृत्तपत्र कोलकात्यात १७८० साली सुरू झाले. त्यांनीच भारतात पत्रकारितेची मुहूर्तमेढ रोवली. मराठीत बाळशास्त्री जांभेकर यांनी २१ जून १८३२ मध्ये 'दर्पण' हे वृत्तपत्र सुरू केले जे १८४० पर्यंत चालले. याच काळात हिंदी व अन्य भारतीय भाषांमध्ये अनेक वृत्तपत्रे सुरू झाली.

वृत्तपत्राची संकल्पना त्याकाळी सर्वसामान्यांमध्ये रुजलेली नसल्याने 'दर्पण'ला सुरुवातीला मोठ्या संख्येने वर्गणीदार मिळाले नाहीत. मात्र ही संकल्पना जशी रुजली, तसे त्यातील विचारही रुजले आणि प्रतिसाद वाढत गेला. ब्रिटिश काळामध्ये वृत्तपत्र चालवणे आणि त्याला वाचक मिळवणे हे मोठे कठीण काम होते. मात्र याही काळात पदरमोड करून व कुठलेही नफ्याचे तत्त्व न स्वीकारता या काळामध्ये सुधारकांनी आपले वृत्तपत्र चालवले यामध्ये बाळशास्त्री जांभेकर यांचे 'दर्पण' हे वृत्तपत्र अग्रणी होते. प्रत्यक्षामध्ये या काळातील वृत्तपत्रे ठराविक काळानंतर प्रसिद्ध केली जात असत. १९५६ मध्ये प्रेस कौन्सिलच्या स्थापनेची शिफारस करून पहिल्या प्रेस कमिशनने असा निष्कर्ष काढला होता की पत्रकारितेत व्यावसायिक नैतिकता टिकवून ठेवण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे कायदेशीर अधिकार असलेली संस्था अस्तित्वात आणणे, मुख्यतः उद्योगाशी संबंधित लोक ज्यांचे कर्तव्य मध्यस्थी करणे असेल. जे लोक त्याची कदर करतात, त्या सर्वांनी हा दिवस साजरा करावा.

**आज राष्ट्रीय पत्रकार दिना निमित्त प्रसार माध्यमातील सर्व पत्रकार बंधु-भगिनींना मन:पूर्वक शुभेच्छा !**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

